जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 JUL 2017
पुण्यनगरी

# ऋतुराज इंदूलकरला विद्यापीठातर्फे कलर अ‍ॅवॉर्ड



**कोल्हापूर : जलतरणपटू ऋतुराज इंदूलकर याला शिवाजी विद्यापीठातर्फे कलर अ‍ॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. गोखले कॉलेजमध्ये त्याच्या सत्कारप्रसंगी प्रा. जयकुमार देसाई, दौलत देसाई व इतर.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गोखले महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋतुराज इंदूलकर याने चंदिगड येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत १५०० मीटर जलतरण क्रीडा प्रकारात कास्यपदक मिळवले. याबद्दल

शिवाजी विद्यापीठातर्फे कलर अ‍ॅवॉर्ड देऊन त्याचा गोखले महाविद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला. सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, दौलत देसाई, डॉ. मंजिरी देसाई, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, प्रा. एन. आर. कांबळे, प्रा. बी. जे. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

2 3 JUL 2017

**Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK announces entrance test result for MPhil, PhD

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) announced the results for MPhil and PhD entrance test.

SUK officials said that any grievances related to the result can be conveyed by Sunday, July 23.

The results of MPhil, PhD exams have been displayed on the university website— www.unishivaji.ac.in under the link MPhil/PhD Admission 2017.

Candidates can go through the details carefully and convey the discrepancies, if any on or before July 23, 2017 by sending a mail to: mphilphd@unishivaji.ac.in.

As per provisions, the qualifying marks for the test will be 50%.

Updates with respect to entrance test and admission procedure will be available on the official website from time to time. Candidates should visit the university website frequently to stay updated about the announcements.

A SUK official said that this year as many as 3,856 aspirants appeared for the Shivaji University's MPhil, PhD entrance exams conducted from June 21 to June 23, across the division. The official said that there are over 500 seats being offered in 47 subjects for PhD candidates, while in MPhil over 100 seats are being offered for 22 subjects.

The procedure for admission is being undertaken as per the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of MPhil/PhD Degrees) Regulations 2016, said the official.

Earlier, Mahesh Kakade, director of SUK board of examinations and evaluation on MPhil and PhD admissions had said that the whole process will be completed by July end and the students will be allotted seats by the middle of August.

It may be noted that the University Grants Commission (UGC) earlier in July 2016 had tweaked its guidelines to allow guides from under-graduate (UG) colleges to offer guideship to MPhil and PhD candidates.

## CHECK YOUR RESULT

- Result of the MPhil, PhD has been displayed on university website **www.unishivaji.ac.in** under link MPhil/PhD Admission 2017.
- Candidates can go through the details carefully and convey the discrepancies, if any on or before July 23, 2017 on email **mphilphd@unishivaji.ac.in**
- Qualifying marks for the test will be **50%** marks

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2017
सकाळ

# पदवीधर नावनोंदणीचा आकडा पंधरा हजारांवर

## मतदारांसाठी 'ॲड्रेस प्रूफ' सक्तीचे

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २२ : विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असून, पदवीधर मतदार नोंदणीचा आकडा पंधरा हजारांवर पोचला आहे. मतदारांसाठी 'ॲड्रेस प्रूफ' सक्तीचे केल्याने ९५ हजार नोंदणीचा आकडा अजून किती खाली येणार, याची उत्सुकता आहे. नावनोंदणीसाठी अद्याप तीन दिवस बाकी आहेत. अधिसभेवर (सिनेट) दहा पदवीधर निवडून द्यायचे असून, पदवीधरांची नावनोंदणी महत्त्वपूर्ण आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून अर्थात १९६२ ते २०१५ दरम्यानच्या पदवीधरांच्या नोंदणीचा आकडा ९५ हजार इतका सांगण्यात येतो. दर पाच वर्षांनी पदवीधरांची नोंदणी होत असली, तरी ज्यांचे पत्ते बदलले, जे मृत झाले, त्यांची नावे कमी झाली नाहीत. प्रत्यक्ष पदवीधरांची नावनोंदणी होत असली, तरी मतदार यादीचा आकडा कमी आहे. महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टच्या अंमलबजावणीनंतर पदवीधरांच्या नावनोंदणीस सुरवात झाली. या नोंदणीसाठी मात्र ॲड्रेसप्रूफ सक्तीचे केले आहे. पॅनकार्ड, आधारकार्ड, वाहन परवाना, शिधापत्रिका आदी कागदपत्रे ॲड्रेस प्रूफ म्हणून पदवीधरांना

पान २ वर »

### दृष्टिक्षेपात..

| | |
|---|---|
| विद्यापीठ अधिकारी | १८ |
| पदवीधर | १० |
| शिक्षक | १० |
| प्राचार्य | १० |
| संस्थाचालक | ६ |
| कुलपती नामनिर्देशित | १० |
| कुलगुरू नामनिर्देशित | ७ |
| पदव्युत्तर शिक्षक | ३ |
| विद्यार्थी कल्याण मंडळ अध्यक्ष व सचिव | २ |
| अधिसभा (सिनेट) रचना | एकूण- ७६ |

# पदवीधर नावनोंदणीचा आकडा पंधरा हजारांवर

» पान १ वरून

सादर करायची आहेत. त्यामुळे आपोआपच नोंदणीचा खरा आकडा यंदा कळेल. शिवाय, बोगस मतदारांनाही चाप बसणार आहे. तूर्त पंधरा हजार इतकी नावनोंदणी झाली आहे. अधिसभेवर दहा पदवीधर निवडून द्यायचे असून, त्यासाठी पदवीधर मतदारांनी मतदान करायचे आहे. दहा पदवीधरांसह विद्यापीठ अधिकारी, शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, कुलपती व कुलगुरू नामनिर्देशित सदस्य, पदव्युत्तर प्राध्यापक, विद्यार्थी कल्याण मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांचा अधिसभेत समावेश आहे. व्यवस्थापन परिषदेची (मॅनेजमेंट कौन्सिल) एकूण संख्या २२ असून, त्यात विद्यापीठ पदाधिकारी, निवडून येणारे सदस्य, नामनिर्देशित सदस्यांचा समावेश असेल. प्राचार्य, प्राध्यापक, संस्था प्रतिनिधी, पदवीधर, निमंत्रित सदस्य यांचा समावेश असणार आहे. प्रत्येक गटात त्या-त्या गटातील सदस्य मतदान करतील. पदवीधराच्या गटात मात्र पदवीधर नावनोंदणी केलेले मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामुळे पदवीधरांची नावनोंदणी किती होणार, याची उत्सुकता आहे.